## Pre-Bid meeting इतिवृत्त

मा.संचालक (कृषि प्रकिया व नियोजन),कृषि आयुक्तालय, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११ जुलै २०१६ रोजी समिती सभागृह, शिवाजीनगर पुणे येथे राकृवियो अंतर्गत सन २००७-०८ ते २०१५-१६ या कालावधीतील लेखांकन (Accounting) करण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली ई-निविदा प्रकिये अंतर्गत वेळापत्रकानुसार Pre-Bid meeting बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी Accounting चे काम करण्यासाठी इच्छूक असलेले सनदी लेखापाल/प्रतिनिधी तसेच सीएमए (Cost management Accounant) अर्हताधारक उपस्थित होते. तसेच राकृवियो कक्षाशी संबंधीत अधिकारी/कर्मचारी सदर सभेत उपस्थित होते.

- Pre-Bid meeting साठी उपस्थित प्रतिनिधी यांनी त्यांना आवश्यक असणारी माहिती व त्या संदर्भात उपस्थित केलेले मुद्दे (अनुक्रमांक १ ते ४ ) बाबत मा.उपसंचालक(नियोजन) यांनी खालीलप्रमाणे माहिती/स्पष्टीकरण दिले.

| अ.क्र. | विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | राकृवियो योजना व कामकाजाचे स्वरुप याबाबत विचारणा. | मा.उपसंचालक(नियोजन) यांनी राष्ट्रीय कृषि विकास योजना संदर्भात माहिती , राकृवियोचे नोडल एजन्सी म्हणून कृषी आयुक्तालयस्तरावरील कामकाजाचे स्वरुप याबाबत माहिती दिली तसेच कृषि व कृषितेर विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजने संदर्भात सविस्तर माहिती दिली. |
| २ | राकृवियो योजनेतंर्गत प्राप्त निधी व वितरण संदर्भात माहिती. | राकृवियो योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास व राज्य शासनाकडून कृषि आयुक्तालयास अनुदान उपलब्ध होते. सदर अनुदानाचे आहरण कृषि आयुक्तालयस्तरावर करण्यात येऊन कृषी व कृषि सलंग्न विभागांना आरटीजीएस/धनादेशाद्वारे लेखा-१ शाखेतून प्रत्यक्ष वितरण केले जाते याबाबत उपस्थितांना माहिती दिली |
| ३ | सन २००७-०८ ते २०१५-१६ या कालावधीत किती निधी प्राप्त झाला याबाबत विचारणा. | सन २००७-०८ त २०१५-१६ या कालावधीत वर्षनिहाय किती निधी प्राप्त झाला याबाबतची माहिती उपस्थित सदस्यांना दिली. |
| ४ | Accounting कामकाजाची व्याप्ती | Accounting चे कामकाज फक्त पुणे मुख्यालयी करण्यात येणार असून. कृषि विभागास वितरीत करण्यात आलेले निधी व कृषि विभागांनी जिल्हानिहाय वितरीत केलेल्या नोंदी तसेच कृषि सलंग्न विभागाना वितरीत निधीचे नोंदी विहित कार्यपध्दतीत (double entry system in tally software ) वेळेत पूर्ण करणेबाबत स्पष्ट केले त्यासाठी आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करुन देणेत येईल. तसेच प्राप्त निधीमधून केलेल्या प्रशासकिय खर्चाच्या नोंदी पूर्ण करणे. |

| अ.क्र. | विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ५ | The Inistitute of Cost Accountant of Inida, Pune Chapter, चेअरमन, सीएमए श्री.अनंत ढवळे यांनी Accounting चे कामकाज करण्यासाठी ई-निविदा प्रकिये मध्ये समावेश करणेबाबत विनंती केली. | Cost Management Accountant असलेले प्रतिनधी व मा.संचालक यांचेयाबाबत चर्चा झाली. त्यानुसार Cost Management Accountant प्रतिनिधी यांनी लेखी पत्र देणे व त्यासोबत supporting document जोडणेबाबत सूचीत केले. तथापी सद्यस्थितीला या कार्यालयाची Accounting चे कामकाज करण्यासाठीची ई-निविदा प्रकिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीला त्यांची विनंती मान्य करणे शक्य नाही परंतू भविष्यात ई-निविदा प्रक्रीया राबविताना नियमानुसार याबाबत विचार केला जाईल असे स्पष्ट केले. |

Pre-Bid meeting साठी उपस्थित प्रतिनिधी त्यांना Accounting चे कामकाजा संदर्भात ई-निविदा प्रकियेमध्ये भाग घेणे विषयी आवश्यक असणारी माहिती मिळाली असल्याचे मान्य केल्याने सर्व समंतीनुसार बैठक समाप्त करण्यात आली.

संचालक
(कृषि प्रकिया व नियोजन)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुण